स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी.पदवीसाठी
सादर करावयाचा संशोधनाचा संक्षिप्त आराखडा.

: संशोधनाचा विषय :

" डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या सत्यशोधकीय साहित्यलेखनाचा ऐतिहासिक अभ्यास. "

:: संशोधक ::

पावडे केशव देविदासराव

:: मार्गदर्शक ::

प्रा. शेटोड एस.एन.
इतिहास विभाग प्रमुख,
शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर,
ता.अर्धापूर, जि.नांदेड.

जुलै 2021

" डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या सत्यशोधकीय साहित्यलेखनाचा ऐतिहासिक अभ्यास. "

प्रस्तावना :-

स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसुत्रीसाठी जनसामान्य माणसांचा कैवारी बनलेला समुदाय म्हणजे सत्यशोधक समाज होय. संसाराकडे दुर्लक्ष करून वर्गसंघर्ष आणि वर्णसंघर्ष ऐरणीवर घेवून मानवमुक्तीच्या ध्येयाकडे हा सत्यशोधकीय व्यक्ती वाटचाल करत राहीला. अशा या सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांनी जुनागंज पेठ, पुणे येथे केली. सत्यशोधक समाज या शब्दाचा अर्थ सत = खरे, शोधक = तपास करणारा, मंडळ = समाज (खरे तपास करणारा समाज) असा होतो. मानवाच्या उत्क्रांतिमध्ये आदिम काळापासून सामाजिक, राजकिय, ऐतिहासिक, सांस्कृतिक अशा वेगवेगळया स्तरांवर संघर्ष होत आलेला आहे आणि या संघर्षाचा शेवट हा सत्याने झालेला आहे. म्हणजेच असत्यावर, अन्यायावर सत्याने विजय मिळवलेला आहे.

भारताचा विचार केला तर भारतात प्राचीन कालखंडात प्रस्थापित समाज व्यवस्थेला विरोध करण्यासाठी विविध परंपरा निर्माण झाल्या. त्यामध्ये जैनधर्म, बौध्दधर्म, लोकायत, शैवतत्वज्ञान, शाक्त संप्रदाय इत्यादींचा समावेश होतो. तर मध्ययुगात वारकरी संप्रदाय, महानुभाव, लिंगायत, सुफी, दत्त इ. सांप्रदायिक परंपरांनी वर्ण व जाती व्यवस्थेला विरोध केला. स्त्री-पुरूष समानतेला महत्व दिले. हीच परंपरा आधुनिक कालखंडात ब्राम्होसमाज, प्रार्थना समाज, आर्य समाज आणि सत्यशोधक समाज यांनी समोर नेली. यांनी प्रस्थापित समाज व्यवस्थेला विरोध केला. यातूनच सत्यशोधकीय साहित्याची निर्मिती झाली. सत्यशोधकीय साहित्याचा मुळ गाभा हा गुलामगिरीला नकार हा आहे.

वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था नाकारणारे, स्त्रीदास्यत्वाला नाकारणारे, कर्मकांडाला विरोध करणारे, मानवीमुल्यांचा, विवेकनिष्ठेचा पुरस्कार करणारे साहित्य म्हणजे सत्यशोधकीय साहित्य होय. सत्यशोधकीय साहित्यामध्ये सत्यशोधकी संवेदना, जाणीवा आणि मुल्ये यांचा विस्तृतपणे उल्लेख आलेला आहे. एखादया व्यक्तीकडे एक माणुस म्हणून पाहणे म्हणजे भुकेलेल्याला अन्न व तहानलेल्याला पाणी देणे एवढे मन संवेदनशिल असणे हा सत्यशोधकीय साहित्याचा मुळ पाया आहे. ' संवेदना ', ' जाणीवा ' आणि ' मुल्य ' या त्रिसुत्रानुसार सत्यशोधकीय साहित्याने प्रस्थापित समाजव्यवस्थेतील मानवाने निर्माण केलेले कृत्रिम भेद, वर्ण, लिंग, जाती, व्यवसाय, पवित्र-अपवित्र या सर्व भेदांना दुर करणारे साहित्य म्हणजे सत्यशोधकीय साहित्य होय.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी ज्या कालखंडात कार्य केले तो कालखंड म्हणजे भारतातील चळवळीचा कालखंड होता. एकीकडे नावापुरते का होईना इंग्रजांचे कायदयाचे राज्य होते. तर दुसरीकडे समाजाने घालून दिलेले नियम, जातियता, अंधश्रध्दा, स्त्री- पुरूष असमानता, आर्थिक विषमता याबाबी होत्या. महात्मा ज्योतिबा फुले यांनी अशावेळी मधला मार्ग निवडला. तो म्हणजे सत्यशोधकीय मार्ग होय. त्यांनी हा मार्ग आपली लेखणी चालवून सुरू केला. म्हणजेच ' सार्वजनिक सत्यधर्म ' आणि ' गुलामगिरी ' या ग्रंथामधून त्यांनी या साहित्यप्रवाहाला चालणा दिली. कोणतेही साहित्य लेखण हे आपला वेगळा प्रवाह घेऊन येते. त्याच प्रमाणे सत्यशोधकीय साहित्य लेखणाने आपला वेगळा प्रवाह आणला. त्यामध्ये सातत्य, विविध साहित्य प्रवाहाची निर्मिती, स्त्री-पुरूषांचा सहभाग, ग्रामीण-शहरी, स्वत:च्या प्रकाशन संस्था, स्वंतत्र वेगळे लिखाण हे निकष असतात. हे सर्व निकष सत्यशोधकीय साहित्यातून दिसून येतात.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधकीय साहित्य लेखणाची परंपरा सुरू केली. त्यानंतर त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत एक श्रृंखलाच तयार झाली व त्याचे पुढील सहा टप्पे बनले.

पहिला टप्पा :- इ.स. १८७३ ते १८९०
दुसरा टप्पा :- इ.स. १८९१ ते १९१०
तिसरा टप्पा :- इ.स. १९११ ते १९३०
चौथा टप्पा :- इ.स. १९३१ ते १९५७
पाचवा टप्पा :- इ.स. १९५८ ते १९७१
सहावा टप्पा :- इ.स. १९७१ ते आजतागायत

या सर्व परंपरेमध्ये ज्या विविध सत्यशोधकीय लेखकांनी लिखाण केले, त्या सर्वांचा मुळ आधार हा महात्मा ज्योतिबा फुले व त्यांचा ' सत्यशोधक समाज ' हा आहे.

सावित्रीबाई फुलेंच्या निधनानंतर १९१० साली एक कोल्हापूरकर सत्यशोधक ना.भास्करराव विठोजी जाधव यांनी सत्यशोधकी ' दिनबंधु ' पत्रात एक लेख प्रसिध्द केला व त्यानुसार मंद होत चाललेली सत्यशोधक चळवळ मार्गस्थ करण्यासाठी १७ एप्रिल १९११ रोजी पूण्यात बालीवाला थिएटरमध्ये पहिली परिषद भरली. याच परिषदेत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या ' गुलामगिरी ' ग्रंथाची दुसरी आवृत्ती (१९११) मध्ये आय्यावारुंनी प्रसिध्द केली. त्यानंतर लागोपाठ आय्यावारुंच्या पत्नी रत्नामाई यांनी तिसरी व मुलगा केशवस्वामींनी (१९२१) मध्ये चौथी आवृत्ती प्रसिध्द केली. इ.स.१९११ ते इ.स.१९३० हा कालखंड सत्यशोधकीय साहित्याचा ' सुवर्णकाळ ' म्हणून ओळखला जातो. कारण या कालखंडात एकुण दहा अधिवेशने संपन्न झाली व नवनविन सत्यशोधकीय विचार मांडणारे लेखण प्रकाशात आले.

१९४० मध्ये सातारचे केशवराव विचारे यांनी सत्यशोधक चळवळ चालवली. १९५७ नंतर ही चळवळ थोडी मंदावली पण १९८८ साली आमदार रायभान संभाजी जाधव यांनी सत्यशोधक समाजाची विविध अधिवेशने घेऊन ही चळवळ पुढे नेली. १९९५ पासून २००० पर्यंत अनेक संम्मेलने झाली. २००० ते २०१० पर्यंत ॲड.वसंतराव फाळके हे अध्यक्ष राहिले. तर २०१० पासून उत्तमराव माधवराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाची धुरा सांभाळली. इ.स. २०१३ मध्ये जी.ए.उगले हे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष झाले. तर १० जानेवारी २०१५ पासून डॉ.अशोक चोपडे यांच्याकडे अध्यक्ष पदाची सुत्रे आली.

२४ सप्टेंबर १८७३ रोजी स्थापण झालेल्या महात्मा ज्योतिबा फुलेंच्या सत्यशोधकीय चळवळीतील कार्यावर अनेक लेखकांनी प्रकाश टाकला आहे. शास्त्री नारोबाबाजी यांनी ' महात्मा ज्योतिबा फुले यांचे अमर जीवन ' ही पुस्तिका १५ नोव्हेंबर १८९१ रोजी प्रकाशित केली. इ.स. १९११ साली अनंत एकनाथ गवंडी (पालकर) यांनी ' ' महाराष्ट्राचा मार्टिन ल्युथर महात्मा ज्योतिराव फुलें यांचे त्रोटक चरित्र ' ही पुस्तिका प्रसिध्द केली. त्यानंतर पंढरीनाथ सिताराम पाटील यांनी ' महात्मा ज्योतिराव फुले ' या नावाने त्यांचे चरित्र प्रसिध्द केले. त्याचप्रमाणे धनंजय कीर यांनी ही महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वर लिखान केले आहे. या लेखकांच्या लिखानामधून महात्मा ज्योतिबा फुले यांचे सत्यशोधकीय विचार व्यक्त झालेले दिसून येतात. सत्यशोधकीय साहित्याने मानवमुक्तीची लढाई यशस्वी करून एकमय जगताची संकल्पना ज्योतिबा फुले यांच्या कार्याने केल्याचे सर्वप्रथम वेगळे मत मांडले. आजच्या पुरोगामी महाराष्ट्राला महात्मा ज्योतिबा फुले व त्यांच्या सत्यशोधक सहकार्यांनी चालवलेली सत्यशोधकीय साहित्याची वाटचाल एक मार्गदर्शक ठरेल. या चळवळीत डॉ.विश्राम रामजी घोले, सदाशिवराव गोवंडे, मोरेश्वर वाळवेकर, सावित्रीबाई रोडे, कृष्णराव पांडुरंग भालेकर, तानुबाई बिरजे, ताराबाई शिंदे, ना.भास्करराव जाधव, प्रा.अण्णासाहेब लठ्ठे, रावसाहेब थोरात, काकासाहेब वाघ, मुकुंदराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख, पां.सी.पाटील, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक महान व्यक्तींच्या लेखणीतून व कार्यातून सत्यशोधकीय साहित्य लेखण समोर येताना दिसते.

याच सत्यशोधकीय साहित्य परंपरेतील विसाव्या शतकातील एक व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.श्रीराम गुंदेकर हे होय. त्यांचे लिखाण हे मराठी साहित्यामधून असले तरी त्याला ऐतिहासिक आधार असल्याचे लक्षात येते. त्यामुळेच तर सबंध महाराष्ट्रभर त्यांच्या कार्याचा प्रसार झालेला आपल्या लक्षात येतो. डॉ.श्रीराम गुंदेकर हे आधुनिक भारतामधील सत्यशोधक चळवळीतील विचारवंत असून सत्यशोधकीय साहित्य लेखणाला प्रोत्साहन देणारे गाढे अभ्यासक होते. सत्यशोधकीय साहित्य लेखणाच्या सर्व सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक बाजूना भारतीय जनसामान्य मानसांमध्ये रूजविण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केलेले आहे.

सत्यशोधकीय साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे रोपटे जनसामान्यांत रूजविण्याचे कार्य करणाऱ्या डॉ.श्रीराम गुंदेकर यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९५५ रोजी मौजे आंबेसावळी, तालुका, जिल्हा बीड येथे झाला. डॉ.श्रीराम गुंदेकर हे प्राध्यापक म्हणून राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे कार्यरत होते. इ.स.२००० पासून अखिल भारतीय सत्यशोधकीय समाजाच्या केंद्रीय कार्यकारणीत चिटणीस होते. तसेच अखिल भारतीय सत्यशोधकीय साहित्य आणि संशोधन परिषदेचे ते अध्यक्ष होते.

डॉ.श्रीराम गुंदेकरांनी सत्यशोधक समाज संघटनेत इ.स.१९९८ साली प्रवेश केला होता. प्रवेश करताच त्यांनी लातूर परिसरातील आपल्या सहकार्यांच्या मदतीने सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा विस्तारत नेली. त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी २ व ३ फेब्रुवारी २००२ रोजी लातूरमधील अग्रसेन भवन येथे सत्यशोधक समाजाचे ३२ वे अधिवेशन भरवले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष ॲड.वसंतराव फाळके हे होते. या अधिवेशनाचे उद्‌घाटन क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवाडी यांनी केले होते.

या अधिवेशनाच्या यशानंतर डॉ.श्रीराम गुंदेकरांनी सत्यशोधकीय साहित्य परिषद स्थापन व्हावी म्हणून पुढाकार घेतला. यासाठी २७ मे २००१ रोजी सोनवडे (सांगली) येथे क्रांतिवीर हुतात्मा नानकसिंग यांच्या जयंती दिनी बैठक घेण्यात आली. या बैठकीचे आयोजन क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवाडी यांनी केले होते. या बैठकीत सत्यशोधकी साहित्य परिषदेची स्थापणा झाली. त्यात डॉ.आ.ह.साळुंखे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती तर डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्याकडे सचिव पदाची सुत्रे देण्यात आली होती. या बैठकीला नटसम्राट निळू फुले, डॉ.आ.ह.साळुंखे, डॉ.भारत पाटणकर, प्रा.वा.ह.कल्याणकर, डॉ.एस.एस.भोसले, डॉ.नागेश चौधरी हे उपस्थित होते. पुढे डॉ.आ.ह.साळुंखे यांनी अध्यक्ष पदाचा राजिनामा दिल्यानंतर डॉ.श्रीराम गुंदेकरांना अध्यक्षपदी विराजमान करण्यात आले. याच कालखंडात डॉ.श्रीराम गुंदेकर व त्यांच्या सहकार्यांनी २० व २१ डिसेंबर २००३ रोजी पहिले सत्यशोधकीय साहित्य संमेलन लातूर येथील ' मुक्ताई मंगल कार्यालय ' येथे भरवण्यात आले होते.

३० व ३१ मे २००९ रोजी सातारा येथे सत्यशोधकी साहित्य परिषदेचे ६ वे अधिवेशन भरले होते. त्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.श्रीराम गुंदेकर हे होते. या अधिवेशनाप्रमाणेच त्यांनी इतर अनेक सामाजिक चळवळीत सहभाग घेतला होता. अंधश्रध्दा निर्मुलन, भ्रष्टाचार विरोध, यज्ञयाग करणे यास विरोध अशा सामाजिक चळवळीतून आपले कार्य केले होते. डॉ.श्रीराम गुंदेकरांनी विविध विचार पीठावरून सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य संस्थाच्या वतीने ७० च्या वर व्याख्याने दिली आहेत.

डॉ.श्रीराम गुंदेकरांनी मोठया प्रमाणात लेखन केले आहे. त्यांच्या लेखनामागचा हेतू हा सत्यशोधक मताचा प्रचार आणि प्रसार हाच होता. त्यांनी सत्यशोधकीय साहित्य लेखनाचा विस्तृतपणे अभ्यास करून त्यांची सखोल

मांडणी केलेली आहे. ही मांडणी त्यांनी ' सत्यशोधकी साहित्याचा इतिहास ' या नावाने ४ खंडामध्ये केलेली आहे. ही मांडणी करताना त्यांनी कालखंडानुसार सत्यशोधक साहित्याची सुरूवात ते आज पर्यंतचा इतिहास टप्याटप्याने मांडलेला आहे. डॉ.श्रीराम गुंदेकरांनी या ४ खंडामधून विस्तृतपणे लिखाण केलेले आहे. त्यांनी प्रत्येक सत्यशोधकी साहित्याला न्याय दिलेला पाहावयास मिळतो. पहिल्या खंडामध्ये प्राचीन कालखंडापासून ते रामदास बाबाजीराव जाधव यांच्या पर्यंतचा सत्यशोधकी लेखकांच्या लिखानाचा उल्लेख आलेला आहे. त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे, कृष्णराव पांडुरंग भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, ताराबाई शिंदे, गणपतराव सखाराम पाटील, गोपाळबाबा वलंगकर, डॉ.यशवंतराव ज्योतिराव फुले, कृष्णराव अर्जुनराव केळुसकर अशा साहित्य शोधकांच्या लिखानाच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे. अशाच प्रकारची मांडणी त्यांनी इतर तीन्ही खंडातून केल्याचे दिसून येते. त्यांच्या ४ खंडामधून सत्यशोधकीय साहित्याचे वेगवेगळे पैलू सहज लक्षात येताना दिसतात.

सत्यशोधकीय साहित्याचा इतिहास या ४ खंडाव्यतिरिक्त डॉ.श्रीराम गुंदेकरांनी पुढील ग्रंथ लिहले आहेत. ' महात्मा ज्योतिबा फुले ' : ' विचारआणि वाङ्मय ', ' महात्मा ज्योतिबा फुले : ' साहित्य आणि साहित्य मुल्ये ', ' सत्यशोधकी साहित्य : ' परंपरा आणि स्वरूप ' , ' सत्यशोधकी निबंध ' , ' राजर्षी शाहू महाराज ' (नवसाक्षरांसाठी पुस्तिका) इ. साहित्य लेखन केलेले आहे. डॉ. श्रीराम गुंदेकरांच्या साहित्य लेखनातून एक बाब प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे त्यांचे लेखन हे संशोधनात्मक स्वरूपाचे आहे.

❖ **संशोधन विषयाची निवड व महत्व** :-

१) डॉ.श्रीराम गुंदेकरांनी सत्यशोधक समाजावर जे लेखन केलेले आहे त्याचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास होणे खूप गरजेचे आहे; परंतु प्रस्तुत विषयावर आतापर्यंत ऐतिहासिक दृष्टीकोनातून तसा अभ्यास झाला नसल्यामुळे संशोधक म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

२) प्रस्तुत विषय हा नविन अभ्यासकांना अभ्यासण्यासाठी उपयुक्त असून तो प्रेरणादायी ठरेल.

३) डॉ.श्रीराम गुंदेकरांचे विचार समाजासमोर यावेत म्हणून प्रस्तुत विषय निवडला आहे.

४) सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीकोनातून हा विषय अत्यंत उपयुक्त आहे. म्हणून प्रस्तुत विषय निवडण्यात आलेला आहे.

५) आधुनिक काळातील परितर्वनाप्रमाणेच २१ व्या शतकातील नविन परिवर्तन घडवून आणण्यासाठी हा विषय मार्गदर्शक ठरणार आहे, म्हणून संशोधकाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

६) डॉ.श्रीराम गुंदेकरांच्या सत्यशोधक साहित्य लेखनाचा एकत्रितपणे अभ्यास करण्यास मदत होईल.

❖ संशोधन विषयाची गृहितके :-

१) डॉ.श्रीराम गुंदेकरांच्या लेखनातून सत्यशोधकीय साहित्य लेखनावर ऐतिहासिक प्रकाश पडतो.

२) डॉ.श्रीराम गुंदेकर यांचे साहित्य लेखन सत्यशोधकीय साहित्यकारांचा एकत्रितपणे अभ्यास करण्यास उपयुक्त ठरते.

३) डॉ.श्रीराम गुंदेकर यांनी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व त्यांचे अनुयायी या संदर्भात संशोधनात्मक लेखन केले आहे.

४) डॉ.श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी महत्वाची भुमिका बजावली आहे.

५) डॉ.श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकीय विचार व साहित्य यांच्या प्रसारासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे जाणवते.

६) डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्य लेखनातून वास्तववादी इतिहासलेखन झाल्याचे आढळून येते.

७) संशोधन कार्याच्या वाटचालीत एखादया गृहितकाचा भर पडू शकते.

❖ संशोधनाची उद्दिष्टे :-

१) डॉ.श्रीराम गुंदेकरांचे चरित्र व कार्य अभ्यासणे.

२) डॉ.श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकीय साहित्य लेखनात दिलेले योगदान अभ्यासणे.

३) डॉ.श्रीराम गुंदेकरांनी सत्यशोधक समाजाचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून केलेल्या मांडणीचा अभ्यास करणे.

४) डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

५) डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या लेखनाला ऐतिहासिक साधनांचा आधार आहे का ? याचा शोध घेणे.

६) संशोधन कार्य चालु असताना यात काही बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

❖ तथ्य संकलन :-

प्रस्तुत विषय अभ्यासत असताना डॉ.श्रीराम गुंदेकरांनी लिहलेले सत्यशोधकीय साहित्य लेखनाचे ' ४ खंड ' मोलाचे सहकार्य करतात. तसेच त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले व सत्यशोधकीय व्यक्तींवर जे संशोधन केलेले आहे, त्या साहित्याचीही मदत होणार आहे. हे सर्व साहित्य वेगवेळया ग्रंथालयामधून संकलन केले जाईल. त्यात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील ग्रंथालय, यशवंत महाविद्यालय नांदेड येथील ग्रंथालय, नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे ग्रंथालय, लातूर येथील राजर्षी शाहू महाराज वरिष्ठ महाविद्यालय येथील

ग्रंथालय, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर, या व इतर ठिकाणावरून प्रस्तुत विषयाची माहिती संकलित करण्यात येईल. या संकलनात सर्व प्राथमिक साधनांवर भर देण्यात येईल. त्याचप्रमाणे डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या परिजनातील व समकालिन असणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात येतील.

❖ संशोधन पध्दत :-

प्रस्तुत विषय अभ्यासत असतांना तो ' संदर्भ संशोधन पध्दत व मुलाखत ' या दोन संशोधन पध्दतीने अभ्यासणार आहे. त्यानंतर त्यांचे विश्लेषणात्मक पध्दतीने विवरण करणार आहे. संशोधन पध्दत वापरत असताना ती प्राथमिक व दुय्यम साधनांवर आधारित असणार आहे. प्राथमिक साधनांमध्ये डॉ.श्रीराम गुंदेकरांनी स्वत: लिहलेले खंड व इतर साहित्य असणार आहेत. मिळालेल्या साधनांच्या आधारे प्रस्तुत विषयावर संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात येईल, आणि परिशिलन करण्यात येईल.

❖ संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

सत्यशोधकीय साहित्यलेखन हा विषय मुळात खुप विस्तृत आहे. कारण हा एक साहित्य प्रवाह आहे. सत्यशोधकीय साहित्य लेखनातील डॉ.श्रीराम गुंदेकरांनी संशोधीत केलेल्या ऐतिहासिक दृष्टीकोनावर माझा प्रकाश पडणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्यावरही या संशोधनातून लेखन होणार आहे. त्याचप्रमाणे सत्यशोधकीय साहित्य लेखनाच्या प्रवाहातील इतर व्यक्तींचाही अभ्यास होणार आहे. संशोधक पुर्णवेळ संशोधक असल्यामुळे येत्या ०३ वर्षात यावर काम होणे गरजेचे आहे. व तसा प्रयत्न करणार आहे. तसेच प्रस्तुत विषयातील डॉ.श्रीराम गुंदेकर यांचे ऐतिहासिक लेखन अभ्यासणे ही या विषयाची मर्यादा आहे.

❖ प्रकरणांची मांडणी :-

प्रस्तृत विषयाच्या संशोधनाची प्रकरण योजना पुढील प्रमाणे राहील.

१) प्रकरण पहिले :- प्रस्तावना

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाची उद्दिष्टे, विषयाचे महत्व, गृहितके, मर्यादा, संशोधन पध्दतीची मांडणी करण्यात येईल. त्याच प्रमाणे विषयाच्याअनुषंगाने पुर्व संशोधनाचा मागोवा प्रस्तुत करण्यात येईल.

२) प्रकरण दुसरे :- डॉ.श्रीराम गुंदेकर यांचा परिचय

प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ.श्रीराम गुंदेकर यांच्या जीवन चरित्राविषयी सविस्तर चर्चा करून त्यांच्या कार्याविषयीचा आढावा घेण्यात येईल. डॉ.श्रीराम गुंदेकरांचा जन्म, बालपण, शिक्षण, नोकरी, कौटुंबिक परिचय, त्यांचे प्रकाशित झालेले ग्रंथ, सत्यशोधकीय साहित्यातील त्यांचे लिखान, त्यांनी केलेल्या सामाजिक चळवळी, त्यांनी कार्यशाळांमध्ये नोंदवलेला सहभाग त्यांनी केलेले ग्रंथांचे परिक्षण, दिलेली व्याख्याने, त्यांना मिळालेले पुरस्कार, पारितोषिके, वेगवेगळया संस्थाअंतर्गत व संघटनासाठीचे कार्य या विविध बाबींवर सविस्तरपणे संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात येईल.

३) प्रकरण तिसरे :- महात्मा ज्योतिबा फुले जीवन व कार्य या संदर्भातील लेखन

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या बाबतीत अनेक लेखकांनी वेगवेगळया बाजुंनी लिखान केलेले आहेत, त्यापैकी फक्त डॉ.श्रीराम गुंदेकर यांनी जे ग्रंथ लेखन केलेले आहे, त्या संदर्भात संशोधनात्मक प्रकाश टाकण्यात येणार आहे.

४) प्रकरण चौथे :- डॉ.श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय साहित्य या संदर्भातील लिखान

डॉ.श्रीराम गुंदेकर यांनी जे सत्यशोधकीय लेखन केलेले आहे, त्या साहित्यावर संशोधनात्मक प्रकाश टाकण्याचे कार्य प्रस्तुत प्रकरणातून करण्यात येणार आहे.

५) प्रकरण पाचवे :- सारांश व निष्कर्ष

प्रस्तृत प्रकरणामध्ये संशोधनाअंती निघालेले निष्कर्ष सारांश रूपाने मांडण्यात येईल.

प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथाची सुची व परिशिष्टे देण्यात येतील.

❖ संदर्भ ग्रंथ सुची

१) डॉ.कौठेकर शांता, : 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान', श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००७.

२) डॉ.देव प्रभाकर, : ' इतिहास एक शास्त्र ', कल्पना प्रकाशन, नांदेड, १९९७.

३) डॉ.सरदेसाई बी.एन., : ' इतिहास लेखन पध्दती ' , फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

४) डॉ. सातभाई श्रीनिवास, : ' इतिहास लेखनशास्त्र' , शशिकांत पिंपळापूरे, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, जून २०१५.

५) डॉ. शिंदे एस.पी., डॉ.डी.बी.मासाळ, डॉ.किशोकुमार गव्हाणे, : ' इतिहास लेखनशास्त्र ' , एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद, जुन २०१५.

६) प्रा.गायकवाड आर.डी , डॉ.सरदेसाई बी.एन, डॉ.हनमाने व्ही.एन, : 'इतिहास लेखनशास्त्र ' , फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९६.

७) डॉ.आगलावे प्रदिप, : 'संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे ', विद्या प्रकाशन, नागपुर, २०००.

८) प्राचार्य. डॉ. काचोळे दा.धो., प्रा. डॉ. मुधोळकर ग.रा. , : ' समाजशास्त्रीय संशोधन पध्दती ', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१५.

९) डॉ. मिसाळ हनुमंत, डॉ. वाडकर एस.विजय , : ' समाजशास्त्रीय संशोधन पध्दती ' , कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

१०) प्रा. गंदेवार एस.एन. , : ' समाजशास्त्रीय संशोधन पध्दती ', विद्या भारती प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती.

११) डॉ. ढगे एस.के., डॉ. हासे सी.पी., : ' संशोधन पध्दती ', के.एस.पब्लिशर्स, पुणे, २०११.

१२) वोहरा वंदना, : ' रिसर्च मेथडोलॉजी ', ओमेगा पब्लिकेशन, नई दिल्ली, २००३.

१३) उगले जी.ए. , : ' सत्यशोधकांचे अंतरंग ', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१७.

१४) फडके. य.दि., : ' महात्मा फुले समग्र वाङमय ', श्रीरामतत्व प्रकाशन, बेळगांव, १९२५.

१५) फडके डॉ.भालचंद्र, : ' सत्यशोधक पत्रकार ' , प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९९७.

१६) डॉ. गुंदेकर श्रीराम , : ' सत्यशोधकी साहित्याचा इतिहास' (खंड पहिला), मुक्तरंग प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती.

१७) डॉ. गुंदेकर श्रीराम , : ' सत्यशोधकी साहित्याचा इतिहास' (खंड दुसरा).

१८) डॉ. गुंदेकर श्रीराम , : ' सत्यशोधकी साहित्याचा इतिहास' (खंड तिसरा).

१९) डॉ. गुंदेकर श्रीराम , : ' सत्यशोधकी साहित्याचा इतिहास' (खंड चौथा).

२०) डॉ. गुंदेकर श्रीराम , : ' महात्मा ज्योतिबा फुले : विचार आणि वाङमय '.

२१) डॉ. गुंदेकर श्रीराम , : ' महात्मा ज्योतिबा फुले : साहित्य आणि साहित्यमुल्ये '.

२२) डॉ. गुंदेकर श्रीराम , : ' सत्यशोधकी निबंध '.

:: मार्गदर्शक ::
डॉ.शेटोड एस.एन.
इतिहास विभाग प्रमुख,
शंकरराव चव्हाण महाविद्यालय,
अर्धापूर, जि.नांदेड.

:: संशोधक ::
पावडे केशव देविदासराव.
एम.ए.,बी.एड., सेट (इतिहास)